# महाराष्ट्र शासन
## विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल
### शासकीय अध्यापक महाविद्यालय, पनवेल जि.रायगड-४१० २०६.

ई-मेल पत्ता :- jtdire.१११५@gmail.com दूरध्वनी व फॅक्स नंबर (०२२-२७४५३८२०)


जा.क्र.विससं/उशि/कोविप/२०२१-२२/ 2526 दिनांक: २५/११/२०२१

प्रति,
सर्व प्राचार्य,
अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
जि.पालघर, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड व ठाणे.

**विषय :- " करिअर कट्टा " या उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन प्राचार्य व समन्वयक यांचे कार्यशाळेबाबत.**

संदर्भ :- मा.शिक्षण संचालनालयाचे प.क्र.विद्यार्थी/२११९/प.क्र.२७/मवि-१/२१०५ दि. १८/०२/२०२१.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्रातील उच्च शिक्षण विभागामध्ये शिकणा-या लाखो विद्यार्थ्यांसाठी "करिअर कट्टा "या राज्य शासनाच्या उपक्रमांतर्गत आयोजित "आय ए एस / उद्योजक आपल्या भेटीला" या कार्यशाळेमार्फत संपूर्ण भारत देशात कार्यरत असणा-या प्रशासकीय अधिका-यांचे व यशस्वी उद्योजकांचे वेगवेगळे अनुभव विद्यार्थ्यांना प्रोत्सहानपर व प्रेरणादायी ठरत आहेत. त्याचप्रमाणे युवकांना प्रशासकीय सेवेमध्ये तसेच नवीन उद्योगामध्ये येण्याचा दृष्टीकोण बदलण्यामध्ये मदत करीत आहे.

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्रशिक्षण विभाग व महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या मार्फत करिअर कट्टा उपक्रम सुरु असल्याचे आपणास ज्ञात आहेच. या उपक्रमांतर्गत विभाग निहाय प्राचार्य, करिअर कट्टा समन्वयक व Career Counselling cell च्या समन्वयासाठी खालील दिलेल्या तपशीलानूसार कार्यशाळे चे आयोजन करण्यात आले आहे. सदर कार्यशाळेस संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य करिअर कट्टा चे समन्वयक आणि करिअर कॉन्सिलींग सेलचे समन्वयक यांनी दिलेल्या दिनांकास व वेळेस महाविद्यालयात उपस्थित रहावे सोबत तपशील जोडण्यात येत आहे.

आपला विश्वासू,

(डॉ.संजय जगताप) २५/११/२१
विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण, कोकण विभाग, पनवेल.

प्रत माहितीस्तव :-
१ मा.संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर.
२.श्री.यशवंत शितोळे, अध्यक्ष, महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांना सादर.
प्रत:-
सदर कार्यशाळेच्या आयोजनाच्या कार्यवाहीस्तव

३. प्राचार्य, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी जि.रत्नागिरी .
४. प्राचार्य, पिल्लाई कॉलेज ऑफ आटर्स कॉमर्स अँड सायन्स.
५.प्राचार्य, बी.के.बिर्ला कॉलेज आटर्स, कॉमर्स अँड सायन्स.

**तपशीलवार तक्ता.**

| अ.क्र. | कार्यशाळा आयोजीत केलेल्या महाविद्यालयाचे नांव. | स्थळ | दिनांक | वेळ |
|---|---|---|---|---|
| १. | सिंधूदुर्ग व रत्नागिरी जिल्हयांतील सर्व महाविद्यालये. | गोगटे जोगळेकर महाविद्यालयाचे सभागृह | ०७/१२/२०२१ | ११.३० |
| २ | नवी मुंबई व ठाणे शहर आणि रायगड जिल्हयातील सर्व महाविद्यालये. | पिल्लाई कॉलेज ऑफ आटर्स कॉमर्स अँड सायन्स. | ०८/१२/२०२१ | ११.३० |
| ३ | ठाणे ग्रामीण व पालघर जिल्हयांतील महाविद्यालये. | बी.के.बिर्ला कॉलेज आटर्स, कॉमर्स अँड सायन्स. | ०९/१२/२०२१ | ११.३० |

**Joint Director**
Higher Education Kokan Region
Panvel, Dist. - Raigad.